CMYK

उमरखेड शहरात शस्त्र घेवून रिल्स बनविणाऱ्याला अटक >> पान 2

सर्वसामान्य व महिलांचा विकास हेच शासनाचे ध्येय : आ. भावना गवळी >> पान 3

गावाच्या विकासासाठी सरपंचांना पाठबळ देणार आ. भावनाताई गवळी >> पान 4

**सुविचार**

विश्वास हा खोडरबर सारखा असतो
तुम्ही केलेल्या प्रत्येक चुकीबरोबर तो कमी होत जातो.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 56 ■ बुधवार, दि. 02 ऑक्टोबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




पुष्पा २ नंतर अलू अर्जुन या ५०० कोटींच्या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर उडवणार धमाल
आतील पान

# पूरग्रस्त राज्यांना मदतीसाठी केंद्रीय गृह मंत्रालयाकडून निधी

## महाराष्ट्राला सर्वाधिक १४९२ कोटी रुपये; मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मानले प्रधानमंत्री नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचे आभार

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** पूरग्रस्त राज्यांना मदत करण्यासाठी गृह मंत्रालयाने आज जारी केलेल्या निधीतून महाराष्ट्राला १४९२ कोटी रुपये मिळाले आहेत. निधीच्या या वाटपात सहाय्य मिळालेल्या १४ राज्यांमध्ये महाराष्ट्राला सर्वाधिक सहाय्य मिळाले आहे. याबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचे आभार मानले आहेत.

पूर आणि भूस्खलनामुळे बाधित झालेल्या राज्यांना केंद्र सरकारकडून आर्थिक आणि लॉजिस्टिक मदत आज जाहीर करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, महाराष्ट्राने केंद्र सरकारकडे काही मागितले की ते लगेचच मिळते, याचा पुन्हा एकदा प्रत्यय आला. गृहमंत्री श्री. शाह यांनी आज राज्यातील शेतकऱ्यांसाठी १,४९२ कोटींचे पॅकेज जाहीर केले. प्रधानमंत्री श्री. मोदी शेतकऱ्यांचा उल्लेख नेहमीच अन्नदाता असा करतात. नैसर्गिक आपत्तीच्या काळात विशेष मदत जाहीर करून त्यांनी आपण कोणत्याही संकटात शेतकऱ्यांच्या आणि राज्याच्या पाठीशी आहोत, हे दाखवून दिले आहे.



# संभाजीराजे छत्रपतींच्या स्वराज संघटनेला 'महाराष्ट्र स्वराज्य पक्ष' म्हणून मान्यता; पक्षचिन्हही मिळालं!

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** संभाजीराजे छत्रपती यांच्या स्वराज्य संघटनेने विधानसभा निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आहे. त्या पाश्वभूमीवर त्यांनी तयारी देखील सुरु केली आहे. अशातच आता त्यांच्या संघटनेला निवडणूक आयोगाने 'महाराष्ट्र स्वराज्य पक्ष' म्हणून मान्यता दिली आहे. संभाजीराजे छत्रपती यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत यासंदर्भात माहिती दिली.



''९ ऑगस्ट २०२२ रोजी तुळजाभवानी मातेच्या साक्षीने आणि हजारो शेतकरी, कष्टकऱ्यांच्या साथीने स्थापन झालेली ''स्वराज्य संघटना'' आता भारतीय निवडणूक आयोगाकडे ''महाराष्ट्र स्वराज्य पक्ष'' या नावाने एक राजकीय पक्ष म्हणून अधिकृतपणे नोंदणीकृत झालेला आहे. अर्थातच, स्वराज्य संघटना आजपासून ''महाराष्ट्र स्वराज्य पक्ष'' म्हणून ओळखला जाईल'', असं छत्रपती संभाजीराजे यांनी सांगितलं. याबरोबरच आगामी विधानसभा निवडणुकीसाठी महाराष्ट्र स्वराज्य पक्षाला ''सप्तकिरणांसह पेनाची निब'' हे निवडणूक चिन्ह मिळाल्याची माहितीही त्यांनी दिली.

पुढे बोलताना त्यांनी कार्यकर्त्यांना उद्देशून संदेशही दिला. ''मागील वर्षभरात आपण आपली संघटना एक पक्ष म्हणून घराघरात पोहोचवली आहे. आता अधिक जोमाने आपल्याला मिळालेले निवडणूक चिन्हदेखील सर्व मतदारांपर्यंत पोहोचवणे >> पान २

# रामटेकची आठवण करून देत उद्धव ठाकरे यांचा काँग्रेसवर अप्रत्यक्ष दबाव

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** रामटेक हा शिवसेनेचाच बालेकिल्ला आहे, मात्र आम्ही लोकसभेत ही जागा काँग्रेसला सोडताना कुठलाही कद्रूपणा केला नाही, अशी आठवण करून देत विधानसभेत ही जागा शिवसेना ठाकरे गटच लढणार, असे खुद्द उद्धव ठाकरे यांनी अप्रत्यक्षपणे सूचित केल्याने नागपूर जिल्ह्यात सर्व जागा लढणार असे जाहीर करणाऱ्या काँग्रेसला तो इशारा मानला जात आहे. त्यामुळे महाविकास आघाडीत जागांच्या वाटपावरून रस्सीखेच होण्याची शक्यता आहे.



माजी मुख्यमंत्री व शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या हस्ते रविवारी नागपूर जिल्ह्यातील कळमेश्वर येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे उद्घाटन झाले. त्यानंतर झालेल्या सभेत ठाकरे यांनी भाषणातून जागा वाटपाबाबतची पक्षाची भूमिकाच अप्रत्यक्षपणे मांडली. रामटेक लोकसभा मतदारसंघ हा शिवसेनेचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जातो. मात्र पक्षफुटीमुळे काँग्रेसने या जागेवर दावा केला आणि ठाकरे यांनी तो मान्य करीत ही जागा काँग्रेससाठी सोडली. काँग्रेसने ही जागा जिंकली तरी त्यात शिवसेनेचा वाटा होता. याची आठवण ठाकरे यांनी कळमेश्वरच्या सभेत करून दिली. कारण काँग्रेसने काटोल वगळता रामटेकसह सर्व पाच जागा लढण्याची तयारी सुरू केली आहे. त्यामुळेच ठाकरे यांनी रामटेक हा शिवसेनेचाच बालेकिल्ला आहे याची आठवण व्यासपीठावर बसलेल्या काँग्रेस नेत्यांना करून दिली. त्यामुळे रामटेकसाठी शिवसेना आग्रही असणार हे स्पष्ट झाले.

**ठाकरे गटाकडून वाढीव जागेची मागणी**

ठाकरे यांनी त्यांच्या नागपूर दौऱ्यात पक्षाच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली. या बैठकीत रामटेकसह हिंगणा, कामठी, शहरातील दक्षिण, पूर्व आणि मध्य नागपूर या सहा विधानसभा मतदारसंघावर दावा करण्याबाबत चर्चा झाली. भाजपसोबत युती असताना काटोलची जागा एकीकृत शिवसेनेकडे होती. तेथे राष्ट्रवादी शरद पवार गटाचे अनिल देशमुख विद्यमान आमदार आहेत. त्यामुळे ही जागा तेच लढणार आहेत. त्यामुळे ठाकरे गट रामटेकसह हिंगणा, कामठी मतदारसंघावर दावा करण्याची शक्यता आहे. दुसरीकडे शहरात काँग्रेसने सर्व सहा जागांवर दावा आहे. तर शिवसनेच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनी दक्षिण, मध्य आणि पूर्व नागपूर मतदारसंघाची मागणी केली आहे. मात्र काँग्रेसचे शहर अध्यक्ष व आमदार विकास ठाकरे यांनी काँग्रेसच सर्व सहा जागा लढणार हे जाहीर केले आहे. शिवसेनेची रामटेक वगळता नागपूर शहरात एकाही मतदारसंघात स्वबळावर विजय संपादन करण्याइतकी राजकीय शक्ती नाही. अशा परिस्थितीत ठाकरे सेनेची मागणी अवाजवी असून लोकसभा निवडणुकीमध्ये सांगलीमध्ये जो प्रकार झाला, त्याची पुनरावृत्ती होण्याची शक्यता नाकारात येत नाही, असे काँग्रेसच्या एका नेत्यांचे म्हणणे आहे. एकूणच शिवसेना ठाकरे गटाकडून होणारी जागांची वाढीव मागणी व त्याला काँग्रेसचा असलेला विरोध लक्षात घेता जागा वाटपावरून शिवसेना आणि काँग्रेस हे दोन महाविकास आघाडीतील पक्ष समोरासमोर येण्याची चिन्हे आहेत.

# शिवसेनेचा भव्य मोर्चात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे : सिद्धार्थ खरात यांच्या आवाहन


## पंधरा वर्षात हा मतदारसंघ तब्बल पन्नास वर्षे मागे : खरात

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी : शेतकरी सर्वसामान्य विद्यार्थी आदींच्या समस्या ह्या दिवसेंदिवस वाढतच आहेत. त्यामुळे या जुलमी सरकारला सत्तेवरून खाली खेचण्यासाठी मतदाराच्या संवेदना चेतना व विकासासाठी सर्वसामान्यांना जागृत करण्यासाठी उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाच्या वतीने गुरुवार दि. ३ ऑक्टोबर रोजी मेहकर येथील उपविभागीय कार्यालयावर भव्य मोर्चा आयोजित केला आहे.**

या मोर्चा मेहकर लोणार मतदार संघातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाचे सिद्धार्थ खरात यांनी केले आहे.
राज्यातील निष्ठूर सरकार मुळे शेतकऱ्यांच्या समस्या वाढल्या आहेत. विद्यार्थ्यांचे शिक्षण, शेतमालाला भाव आदी अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत.तर मेहकर मतदार संघात गेल्या १५ वर्षापासून एकच व्यक्ती प्रतिनिधित्व करीत आहे.

मात्र पंधरा वर्षात हा मतदारसंघ तब्बल पन्नास वर्षे मागे गेलेला आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात सर्वसामान्याचे प्रश्न सुटावे त्यांना सर्वांगीण सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाच्या वतीने दि.३ ऑक्टोबर रोजी मेहकर उपविभागीय कार्यालयावर संवेदना, चेतना जागृत व्हाव्या, विकासासाठी सर्वसामान्य पुढाकार घ्यावा, मतदार संघातील समस्या मार्गी लागून संजीवनी मिळावी, लोकशाही अबाधित ठेवण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा, यासाठी भव्य मोर्चा आयोजित केला आहे.



या मोर्चात विरोधी पक्ष नेते अंबादास दावणे, शिवसेना जिल्हाप्रमुख जालिंदर बुधवंत, प्रा. नरेंद्र खेडेकर,धर्मवीर पुत्र प्राध्यापक आशिष रहाटे, गोपाल बछिरे. निंबाजी पांडव, दीपक मापारी यासह शिवसेनेचे पदाधिकारी तसेच महिला पदाधिकारी उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत.
तरी मेहकर लोणार मतदार संघातील नागरिकांनी मोठ्या संख्येने या मोर्चाला उपस्थित राहावे, असे आवाहन उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे इच्छुक उमेदवार सिद्धार्थ खरात यांनी केले आहे.

# प्रबोधनाद्वारे राज्यातील गरजूंपर्यंत शासकीय योजनाही पोहोचवाव्यात– मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

## कणेरी मठ येथील संत समावेश कार्यक्रमात उपस्थित प्रबोधनकारांना आवाहन

## देशी गायींना पालनपोषणासाठी प्रति दिन ५० रू. आणि राज्य मातेचा दर्जा दिल्याबद्दल मुख्यमंत्र्यांचा विशेष सन्मान

दैनिक आपला विदर्भ

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** राज्य शासनाने गोरगरीब, महिला तसेच जेष्ठ नागरिक, शेतकरी, विद्यार्थ्यांसाठी महत्त्वकांक्षी योजनांमधून त्यांच्या स्वप्नांना बळ देण्याचे काम केले आहे. अशा या योजना राज्यातील गरजूंपर्यंत पोहोचवण्याचे कार्य आपल्या प्रबोधनाद्वारे करावे, असे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उपस्थित प्रबोधनकारांना केले. कोल्हापूर येथील श्री क्षेत्र सिद्धगिरी महासंस्थान, कणेरी मठ येथे आयोजित संत समावेश कार्यक्रमाच्या समारोपीय चर्चासत्रात मुख्यमंत्री बोलत होते. या कार्यक्रमावेळी मंचावर कणेरी मठाचे अदृश्य काडसिद्धेश्र्वर स्वामी, हभप राणा वास्कर, रामगिरी महाराज, निरंजन महाराज, विश्र्वस्त माणिक मोरे आदी मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, समाजाला जागृत करण्याचे कार्य हजारो प्रबोधनकार करीत असतात. समाजाला दिशा देण्याचे कार्य आपण पार पाडत असताना समाजातील प्रत्येक कुटुंबासाठी शासनाने सुरू केलेल्या महत्त्वकांक्षी योजनाही पोहचल्या तर त्या प्रत्येक कुटुंबाला आधार मिळेल. गोमातेचे सरंक्षण केले पाहिजे असे सांगून गोशाळांमधील देशी गायींच्या पालन–पोषणासाठी प्रति दिन, प्रति गाय ५० रुपये अनुदान योजना राबवण्याचा निर्णय शासनाने नुकताच घेतला असल्याचे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले.

भारतीय संस्कृतीत गायीला अनन्यसाधारण महत्त्व आहे, देशी गायीला राज्य माता–गोमाता घोषित करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. राज्य शासनाने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना, जेष्ठ नागरिकांच्या योजना, शेतकऱ्यांच्या योजना अशा विविध लोककल्याणकारी योजना शासनाने सुरु केल्या आहेत. हे राज्य शेतकरी, बळीराजा, वारकरी, कष्टाकरी, कामगार, माता भगिनी, जेष्ठ नागरिकांचे आहे. सर्व सामान्यांच्या हितासाठी काम करणारे आहे असे सांगून शासकीय कार्यालयात लोकांची कामे प्रलंबित राहू नये, म्हणून शासनाने शासन आपल्या दारी योजना सुरु केली आणि या योजनेतून ५ कोटी लोकांनी लाभ घेतल्याचे त्यांनी सांगितले.



मुख्यमंत्री श्री.शिंदे म्हणाले की, जनताच माझी ताकद असून त्यांच्यासाठी काम करणारा मी सर्वसामान्य माणूस आहे. त्यांच्यासाठी अनेक योजना तर सुरूच केल्याच त्याचबरोबर आता आपण पर्यावरण संरक्षण, तापमान वाढीवरील नियंत्रण, सेंद्रीय शेती अशा अनेक माध्यमातून काम करूया. या कार्यक्रमात त्यांचा तुळशी हार देऊन व गोमाता दान करून विशेष सत्कार करण्यात आला. समारोपानंतर त्यांनी उपस्थित सर्व प्रबोधनकार, स्वामी, हभप यांची निवेदने स्विकारली तसेच सोबत बसून विविध विषयांवर चर्चा केली. उपस्थित महिला प्रबोधनकरांनी त्यांचे औक्षणही यावेळी केले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे कोल्हापूर विमानतळ येथे जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी महापालिका आयुक्त के. मंजुलक्ष्मी, मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकेयन एस., खासदार धैर्यशील माने, इचलकरंजी महापालिका आयुक्त ओमप्रकाश दिवटे, प्रभारी पोलिस अधीक्षक निकेश खाटमोडे, माजी खासदार संजय मंडलिक, माजी आमदार चंद्रदीप नरके उपस्थित होते.

CMYK

# उमरखेड शहरात शस्त्र घेवून रिल्स बनविणाऱ्याला अटक

## रिल्स प्रसारीत न करण्याचे पोलिसांचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**यवतमाळ/प्रतिनिधी** : सध्या समाजमाध्यमावर वेगवेगळ्या प्रकारच्या रिल बनवुन भाईगीरी करणा–याचे मोठया प्रमाणात तरुणाईमध्ये फॅड निर्माण झाले आहे.अशाच एका तरुणाला काल दिनांक ३० सप्टेंबर रोजी उमरखेड पोलिसांनी ताब्यात घेतले असून पोलिसांनी या घटनेची रिल कुणीही प्रसारीत करू नये असे आवाहन केले आहे.

या घटनेतील ताब्यात घेण्यात आलेल्या युवकाचे शेख गौस शेख करीम (२५) रा. नागापुर रुपाळा ता. उमरखेड असे नाव असून त्याने हातात धारदार शस्त्र घेवुन रिल बनवुन इस्टाग्रॉमवर रिलीज करून प्रसारमाध्यमावर प्रसारीत केली. या घटनेची माहिती त्वरीत पोलिस प्रशासनाला मिळाली.



पोलीस दल अशाप्रकारे भाईगीरी करणा–या गुन्हेगारी प्रवृत्तीच्या इसमांच्या कृत्यावर लक्ष ठेवुन असतात. यामुळे काल दि.३०/०९/२०२४ रोजी सपोनि भगत यांना पो. स्टे.ला हजर असताना गोपनीय बातमीदाराकडुन माहीती मिळाली की, सोशल मिडीयावर एक व्हीडीओ व्हायरल होत असुन त्यामध्ये एक ईसम हातात एक धारदार चाकु घेऊन रिल्स बनवुन ईन्स्टाग्रामवर व्हायरल केला आहे. व सदर इसम हा धारदार चाकु गुन्हेगारी कृत्य करायाच्या दृष्टीने सतत सोबत बाळगुन असतो. अशा खात्रीशीर माहीतीवरून, सदर इसम शेख गौस शेख करीम वय–२५ वर्षे व्यवसाय मजुरी रा. नागापुर रुपाळा ता. उमरखेड जि. यवतमाळ हा निष्पन्न करण्यात आला. व तो उमरखेड शहरात हजर असल्याचे समजले. यावरुन सपोनि कैलास भगत सोबत परि. पोउपनि सागर ईंगळे, पोकों टेंबरे तसेच सोबत दोन पंचसह कार्यवाही साठी रवाना झालेअसतांना. मिळालेल्या माहीतीप्रमाणे तो मीलुन आला. त्याची ओळख पटवुन त्यास त्याचे नाव विचारले असता, त्याने त्याचे नाव शेख गौस शेख करीम वय–२५ वर्षे व्यवसाय मजुरी रा.नागापुर रुपाळा ता. उमरखेड जि. यवतमाळ असे सांगितले पंचामक्ष त्याची झडती घेतली असता त्याचे जवळ एक चाकु लाल काळया रंगाची लाकडी मुठ असलेला ज्याची लांबी टोकापसुन मुठीपर्यंत पात्याची लांबी चार ईंच व मुठीची लांबी पाच ईय पात्याची मध्यभागी रुंदी एक ईम बटण दाबल्यावर चालु बंद होणारा जुना वापरता चाकु किंमत अंदाजे २५०/ रुपये तसेच एक ओप्पो कंपनीचा आकाशी रंगाचा जुना वापरता मोबाईल किंमत अंदाजे ८००० रुपये मिळुन आले. सदरची कारवाई कुमार चिंता पोलीस अधीक्षक,पियुष जगताप अप्पर पोलीस अधीक्षक, उपविभागीय अधिकारी गायकवाड, प्रभारी अधिकारी सपोनि कैलास भगत, यांचे मार्गदर्शनात परि. पोउपनि सागर इंगळे, पोशि संघशील टेंभरे, यांनी केली आहे.

तरुणांनी गुन्हेगारी कृत्यांचे समर्थन करणारे व भाईगीरी करणारे व हातात घातक शस्त्र घेवुन समाजात भीती निर्माण करणारे रील्स बनवुन समाजमाध्यमावर प्रसारीत करुन, समाजात दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न करु नये. अन्यथा याचे उल्लघन करणा–यावर योग्य ती कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

**–संजय सोळंके**
**पोलीस निरीक्षक, उमरखेड.**

# भारत मातेचे थोर सुपुत्र ; लाल बहादूर शास्त्री

भारत मातेचे थोर सुपुत्र देशाचे दुसरे पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची आज जयंती आहे. लालबहादूर शास्त्री यांचे पूर्ण नाव लालबहादूर शारदाप्रसाद वर्मा असे होते. पण १९२५ साली बनारस येथील काशी विद्यापीठाची शास्त्री ही पदवी लालबहादूर यांनी मिळवली त्यामुळे त्यांना सर्वजण शास्त्री म्हणू लागले पुढे त्यांनी आपल्या नावापुढे शास्त्री हेच नाव लावले आणि ते लालबहादूर वर्माचे लालबहादूर शास्त्री बनले. त्यांचा जन्म २ ऑक्टोबर १९०४ रोजी उत्तर प्रदेशातील मोगल सराई या गावात झाला. लालबहादूर शास्त्री दीड वर्षाचे असतानाच त्यांच्या वडिलांचे निधन झाले. त्यांच्या आईनेच त्यांचा सांभाळ केला. लालबहादूर शास्त्री यांचे बालपण गरिबीतच गेले. घरची हलाखीची परिस्थिती असूनही लालबहादूर यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. शालेय वयातच लाला लजपतरायांनी स्थापन केलेल्या द सर्व्हन्ट ऑफ द पीपल सोसायटीचे सदस्यत्व त्यांनी घेतले. महात्मा गांधींच्या विचाराने ते प्रभावित झाले होते. गांधीजींच्या असहकार चळवळीत त्यांनी भाग घेतला. गांधीजींसोबत दांडी यात्रेतही त्यांनी भाग घेतला होता. १९३९ साली त्यांची पंडित नेहरूंशी भेट झाली आणि ते स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाले. देश स्वतंत्र झाल्यावर पंडित नेहरुंच्या पहिल्या मंत्रिमंडळात त्यांनी रेल्वे व वाहतूक, दळणवळण, वाणिज्य व उद्योग आणि गृहमंत्रीपद भूषविले. ते रेल्वेमंत्री असताना एकदा रेल्वेचा अपघात झाला होता त्यात काही प्रवाशांना स्वतःचा जीव गमवावा लागला होता या अपघाताची नैतिक जबाबदारी स्वीकारुन त्यांनी रेल्वेमंत्रीपदाचा राजीनामा दिला होता. देश आणि संसदेने त्यांच्या या अभूतपूर्व निर्णयाची प्रशंसा केली होती. तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू यांनीही त्यांच्या या इनामदार वृत्ती आणि आदर्श मूल्यांची संसदेत प्रशंसा केली होती. पंडित नेहरुंच्या आकस्मिक निधनानंतर देशाची धुरा त्यांच्याकडे आली. ९ जानेवारी १९६४ रोजी देशाचे दुसरे पंतप्रधान म्हणून त्यांनी शपथ घेतली. शपथ घेतल्यानंतर अल्पावधीतच त्यांनी आपल्या कर्तुत्ववाने पंतप्रधानपदावर ठसा उमटविला. प्रखर राष्ट्रवादी असलेल्या शास्त्रीजींनी आपल्या पंतप्रधान कालावधीत देशहिताचे अनेक निर्णय घेतले. १९६५ साली पाकिस्तानने आगळीक करुन भारताशी युद्ध पुकारले. पण देशात लालबहादूर शास्त्री यांच्यासारखे खंबीर नेतृत्व असल्याने पाकिस्तानला माघार घ्यावी लागली. आपल्या कणखर नेतृत्वाने त्यांनी पाकिस्तानला पराभूत केले. या युद्धानंतर त्यांच्या नेतृत्वाने जगातील मातब्बर नेते प्रभावित झाले. जय जवान, जय किसान या त्यांच्या मंत्राने देश भारावून गेला. लालबहादूर शास्त्री हे अवघे १९ महिने पंतप्रधान होते. या १९ महिन्यांच्या कालावधीत जनसामान्यांच्या हृदयात त्यांनी अढळ स्थान मिळवले. ११ जानेवारी १९६६ रोजी त्यांचे निधन झाले. जयंतीदिनी शास्त्रीजींना विनम्र अभिवादन!

# दिल्लीतील ही देवीची मंदिरे आहेत प्रसिद्ध; नवरात्रात असते लाखो भाविकांची गर्दी



आपल्या भारतातील सण उत्सवांना खूप जास्त महत्त्व आहे. प्रत्येक सणाला एक इतिहास आणि परंपरा जोडलेली आहे. नुकताच आपल्या भारतामध्ये गणेशोत्सव साजरा झाला आणि आता काही दिवसातच नवरात्रीच्या सणाला देखील सुरुवात होणार आहे. यावर्षी ३ ऑक्टोबर रोजी नवरात्राला सुरुवात होत आहे. तर १२ ऑक्टोबर रोजी दसरा आहे. नवरात्रीच्या या दिवसांमध्ये असे मानले जाते की, देवी माता ही पृथ्वीवर अवतरलेली असते. आणि यावेळी ती तिच्या सगळ्या भक्तांच्या इच्छा पूर्ण करते. त्यामुळे अनेक लोक नवरात्रीच्या काळात हे अनेक देवींच्या मंदिरांना भेटी देतात. आणि देवीची आराधना करतात. आता आपण अशाच काही देवीच्या मंदिरांबद्दल जाणून घेणार आहोत.

दुर्गा मातेची अनेक मंदिरे ही भारतभरात आहेत. परंतु दक्षिण दिल्लीत असलेले माकालिकाजी हे मंदिर सर्वात प्रसिद्ध मंदिर आहे. तसेच या मंदिराला एक प्राचीन इतिहास आहे. तेवढेच नाही तर या मंदिराचा इतिहास हा पांडवांशी जोडलेला आहे. असे म्हटले जाते या मंदिराला जयंती पीठ मनोकामना सिद्ध पीठ म्हणून देखील ओळखले जाते. असे मानले जाते की, ही देवी सगळ्यांच्या मनोकामना पूर्ण करते. त्यामुळे नवरात्रीच्या काळात या मंदिरामध्ये खूप जास्त गर्दी असते. देवीच्या दर्शनासाठी खूप दूर वरून भाविक भक्त येत असतात.

कोलकत्याच्या प्रसिद्ध दक्षिणेश्वर येथे काली मंदिर आहे. या ठिकाणी महाकालीची मूर्ती देखील बसवण्यात आलेली आहे. नवरात्रीच्या काळात या मंदिरात देखील मोठ्या प्रमाणात गर्दी असते. नवरात्री उत्सवया मंदिरात मोठ्या थाटामाटात पार केला जातो. तसेच देवीच्या दर्शनासाठी येथे अनेक भाविक भक्त येत असतात. हे मंदिर ५०० वर्षांपेक्षा अधिक जुने आहे. असे म्हणतात की जो भक्त या देवीची मनोभावे पूजा करतो. आराधना करतो त्या व्यक्तीला ही देवी भरभरून देत असते.

माता कात्यायलीचे मंदिर देखील खूप प्रसिद्ध मंदिर आहे. हे मंदिर दिल्लीच्या छत्रपूर या भागात आहे. या मंदिराची खासियत म्हणजे हे मंदिर पांढऱ्या संगमवरी वर बनवलेले आहे. हे मंदिर तब्बल ७० एकरामध्ये पसरलेले आहे. अत्यंत भव्य दिव्य आणि मोठे असणारे हे मंदिर खूप जास्त प्रसिद्ध आहे. वर्षभर या मंदिरात भाविक भक्तांची खूप गर्दी असते नवरात्रीमध्ये तर या मंदिरात अनेक भाविक भक्त येत असतात. आणि मनोभावे प्रार्थना करत असतात या मंदिरात पहाटे ४ वाजलेपासून ते रात्री ११ वाजेपर्यंत तुम्ही कधीही जाऊ शकता.

दिल्लीच्या प्रीत विहारांमध्ये देखील एक गुहा मंदिर आहे. हे मंदिर माता वैष्णोदेवीचे आहे. यामुळे यामध्ये एक लांब गुहा बनवलेला देण्यात आलेली आहे. तसेच अनेक छोट्या गुहा देखील आहेत. यामध्ये अनेक मंदिरे बांधलेली आहे. त्यामुळे या मंदिरात गेल्यावर तुम्हाला वैष्णोदेवीचे दर्शन घेतल्यासारखे वाटेल. या ठिकाणी देखील खूप भाविक भक्तांची गर्दी असते. आणि नवरात्रीच्या दिवसात अनेक लोक या ठिकाणी दर्शनासाठी येत असतात.

दिल्लीमध्ये असलेले स्थित झेंडे वाला हे मंदिर देखील एक प्रसिद्ध मंदिर आहे. या मंदिरात वर्षभर भाविक भक्तांची खूप गर्दी असते. नवरात्रीमध्ये जर लाखो संख्येने भाविक या मातेच्या दर्शनासाठी येतात असतात. असे म्हटले जाते की, मंदिराच्या उत्खननामध्ये एक ध्वज सापडला आहे. त्यामुळे हे मंदिर ध्वज मंदिर बनले आहे.

# 'जय महाराष्ट्र' कार्यक्रम नवीन दिमाखदार रुपात पुन्हा सुरु; २ ऑक्टोबर रोजी कार्यक्रमाच्या पहिल्या भागात मुख्य सचिव सुजाता सौनिक यांची मुलाखत




दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित 'जय महाराष्ट्र' हा कार्यक्रम नवीन दिमाखदार स्वरूपात दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवरुन जनतेच्या भेटीला येत आहे. 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमाच्या नवीन स्वरूपातील पहिल्या भागात मुख्य सचिव सुजाता सौनिक यांची मुलाखत प्रसारित होणार आहे.

उदंड प्रतिसाद लाभलेल्या 'जय महाराष्ट्र'चे जनतेच्या मनात आगळेवेगळे स्थान

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमाने मागील अनेक वर्षांपासून जनतेच्या मनात एक वेगळे स्थान निर्माण केले असून या कार्यक्रमाला जनतेचा उदंड प्रतिसाद लाभला आहे. या कार्यक्रमात मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, मंत्री तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर, संबंधित क्षेत्रातील अभ्यासक व विचारवंत यांच्या मुलाखती प्रसारित करण्यात येतात. आताही या कार्यक्रमात नवीन स्वरूपात विविध विषयांवरील मुलाखती व संवाद सादर करण्यात येणार आहेत.

विकसित महाराष्ट्राबाबत मुख्य सचिवांनी मांडले विचार

राज्य शासन जनतेच्या कल्याणासाठी वेळोवेळी धोरणात्मक निर्णय घेत आहे. हे निर्णय विविध योजना आणि उपक्रमांच्या माध्यमातून जनतेपर्यंत पोहोचविण्याचे काम करत आहे. शिक्षण, आरोग्य, उद्योग, कृषी, आपत्ती व्यवस्थापन, तसेच महिला आणि युवकांच्या सक्षमीकरणासाठी अनेक योजना राबविण्यात येत आहे. यामध्ये राज्यात युवकांना रोजगार उपलब्ध करून देणे तसेच मुख्यमंत्री – माझी लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून महिलांना आर्थिक निर्भर करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. या योजनांचे नियोजन व अंमलबजावणी याबाबत मुख्य सचिव श्रीमती सौनिक यांनी 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमाच्या नवीन स्वरूपातील पहिल्या भागात जनतेशी संवाद साधला आहे.

'जय महाराष्ट्र' कार्यक्रमात ही मुलाखत बुधवार दि. २ ऑक्टोबर २०२४ रोजी सायंकाळी ८ वा. दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवर प्रसारित होणार आहे. तसेच महासंचालनालयाच्या समाजमाध्यमांच्या पुढील लिंकवर ही मुलाखत ऐकता येणार आहे. शिबानी जोशी यांनी ही मुलाखत घेतली आहे.

# पुष्पा २ नंतर अल्लू अर्जुन या ५०० कोटींच्या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर उडवणार धमाल

**मुंबई/प्रतिनिधी** : अल्लू अर्जुनचा 'पुष्पा २' हा चित्रपट यावर्षी ६ डिसेंबरला प्रदर्शित होणार आहे. यापूर्वी तो १५ ऑगस्टला प्रदर्शित होणार होता. मात्र काम पूर्ण न झाल्याने त्याची रिलीज डेट पुढे ढकलण्यात आली. हा या वर्षातील सर्वात मोठा चित्रपट मानला जात आहे. बऱ्याच अहवालांमध्ये, या वर्षातील मोस्ट अवेटेड चित्रपटांच्या यादीत याला शीर्षस्थानी ठेवण्यात आले आहे. यातून किमान १००० कोटी रुपयांची कमाई होईल, असे व्यापार विश्र्लेषक सांगत आहेत.

साहजिकच या चित्रपटानंतर अल्लू अर्जुनचे स्टारडम आणखी वाढणार आहे. अशा परिस्थितीत तो त्याच्या पुढच्या चित्रपटाची निवड अत्यंत काळजीपूर्वक करत आहे. 'पुष्पा २' नंतर अल्लू त्रिविक्रमच्या चित्रपटात काम करणार असल्याचे बोलले जात आहे.

सध्या अल्लू अनेक दिग्दर्शकांच्या संपर्कात आहे. पण गोष्टी घडत नाहीत. त्याने टलीचीही भेट घेतल्याचे सांगण्यात आले, पण पुढे काहीच झाले नाही. त्यासाठी टली याने जास्त शुल्काची मागणी केल्याचे कारण देण्यात आले. अल्लू आणि निर्माते यावर सहमत नव्हते. आता एकच नाव समोर येत आहे आणि ते म्हणजे त्रिविक्रम. अल्लूला या चित्रपटाची स्क्रिप्ट आवडली असून तो त्या दिशेने वाटचाल करणार असल्याचे बोलले जात आहे. त्याचे बजेटही जाहीर झाले आहे. तो तयार करण्यासाठी ४००–५०० कोटी रुपये खर्च होणार असल्याची माहिती आहे.

त्रिविक्रमने याआधी अल्लू अर्जुनसोबत 'अला वैकुंठपुरमुलू'मध्ये काम केले आहे. त्या चित्रपटाचे खूप कौतुक झाले.

# शेलोडी येथे माकडांमुळे शेती पिकाचे नुकसान

## वन विभागाने बंदोबस्त करण्याची मागणी

दैनिक आपला विदर्भ

**यवतमाळ/प्रतिनिधी** : शेलोडी परिसरात माकडांनी धुमाकूळ घालत कापुस, सोयाबीन पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान केले असून शेतकरी हैराण झाला आहे. शेलोडी, देवगिरी परिसरात कापुस सोयाबीन पीक मोठ्या प्रमाणात घेतले जाते. सोयाबीन पीक आता काढणीला आला आहे. पंधरा वीस माकडांचा कळप शिवारात धुमाकूळ घालत आहे. कापूस व सोयाबीन पिकाचे माकडांनी मोठ्या प्रमाणात नुकसान केले आहे. शेतकऱ्यांच्या डोळ्यांदेखत माकडे पीक फस्त करत असून राखणीला गेलेल्या शेतकऱ्यांवर हल्ले करत आहेत त्यामुळे शेतकरी वर्गात भितीचे वातावरण आहे. वर्षभर कष्ट करून हातातोंडाशी आलेली पिके अशी वन्यप्राण्यांकडून फस्त केलीली पाहून शेतकरी हवालदिल झाला आहे.

वनविभागाकडे शेतकऱ्यांनी तक्रार केली असून वनविभाग कानाडोळा करत आहे. वनविभागाने वन्यप्राण्यांचा बंदोबस्त करून नुकसान भरपाई मिळावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.याबाबत वन विभागाला निवेदन देते वेळी काशिनाथ राठोड माजी ग्रा.पं.सदस्य, नितीन कावळे, कार्तिक चौधरी, अतुल ठोकळ, गजानन जाधव, ज्ञानेश्र्वर रोहणकर, प्रविण काणकिरड, अविनाश गिरी, गोपाल बोबडे, गणेश राऊत, सुनील कावळे,किरण चव्हाण ,हेमंत कावळे, दिनेश खोडे, अमोल सायगण,रोहित कानकीरड, नाना गावंडे, हेमंत ठोकळ,ऋषिकेश कावळे, गजानन काटकर योगेश राऊत,अभय काणकिरड, मनोहर खाडे, चेतन बोबडे, दत्ता पाठे, लखन खोडे आदी शेतकरी वर्ग उपस्थित होते.



DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### अल्पवयीन मुलीची छेड काढणाऱ्याला तरुणाला अटक; कल्याण कोळशेवाडी पोलिसांची कारवाई

दैनिक आपला विदर्भ



**कल्याण/प्रतिनिधी :** एका १३ वर्षीय मुलीचा पाठलाग करत तिची छेड काढणाऱ्या तरुणाला कल्याण कोळशेवाडी पोलिसांनीं बेड्या ठोकल्या आहेत. चंद्रकात दिवेकर अस या आरोपीचे नाव आहे. ही अल्पवयीन मुलगी कल्याण पूर्व परिसरात आपल्या घराच्या दिशेने जात होती याच वेळी चंद्रकांतने तिचा पाठलाग केला तिची छेड काढली. घडल्या प्रकाराबाबत घाबरलेल्या मुलीने आपल्या कुटुंबियांना सांगितले. कुटुंबियांनी तत्काळ कोळशेवाडी पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार नोंदवली. या तक्रारी नुसार पोलिसांनी गुन्हा दाखल करत चंद्रकांत दिवेकर याला बेड्या ठोकल्यात.

### महाराष्ट्रात यंदा सरासरीहून अधिक पावसाची नोंद, परतीच्या पावसाचा मुक्काम अजून किती दिवस?

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्रात यंदा मान्सूनची दमदार हजेरी लागली असून जून ते सप्टेंबर दरम्यान सरासरीपेक्षा १२६म पावसाची नोंद झाली आहे. राज्यात सर्वाधिक पावसाची नोंद मध्य महाराष्ट्रात झाल्याचे सांगण्यात आले आहे. मागील वर्षी सरासरीहून कमी पाऊस झाल्याने संपूर्ण महाराष्ट्रात सिंचनासह पिण्याच्या पाण्यासाठी ताटकळावे लागले. पण यंदा पावसाने मागील वर्षीची कसर भरून काढली आहे.

राज्यात जून ते सप्टेंबर दरम्यान ९९४.५ मी पावसाची नोंद होत असते मात्र, यंदा प्रत्यक्षात १,२५२.१ मीमी पाऊस बरसला आहे.

मध्य महाराष्ट्रात सर्वाधिक पाऊस

राज्यात यंदा मध्य महाराष्ट्रात सर्वाधिक पाऊस झाला. ऑगस्ट महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात झालेल्या पावसाने तर पूर परिस्थिती निर्माण होऊन नागरिकांची मोठी तारांबळ उडाली होती. मध्य महाराष्ट्रात सरासरीपेक्षा १३९म अधिक पावसाची नोंद झाली आहे. म ध्य महाराष्ट्रात पावसाळ्यात साधारण ७४७.४ मी पाऊस कोसळतो. यंदा मात्र यात अधिकची भर पडली आहे. मध्य महाराष्ट्रात यंदा १३३५.८ मीमी पाऊस पडला आहे.

कोकणात सरासरीपेक्षा १२९म पाऊस

कोकणात मान्सून मध्ये एरवी २८७०.८ स्स एवढ्या सरासरी पावसाची नोंद होत असते. मात्र, यंदा ३७१०.६ स पाऊस झाला आहे. कोकणात यंदा सरासरीपेक्षा १२९% पाऊस झाला आहे. कोकणासह मुंबई उपनगरातही बेफाम पाऊस झाल्यानं धरणे भरली आहेत.

मराठवाड्यातील शेतकऱ्यांना मान्सूनने दिलासा

दुष्काळी मराठवाड्यावर यंदा मान्सून ने आभाळमाया दाखवली असून मराठवाड्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. मराठवाड्यात सरासरी ६४२.८ स्स पाऊस होत असतो. यंदा ७७२.५ मी पावसाची नोंद करण्यात आली असून सरासरी पेक्षा १२०म पाऊस अधिक झाला आहे. मराठवाड्यातील धरणे तुडुंब भरली असून रब्बी हंगामाच्या तोंडावर शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

विदर्भात किती झाला पाऊस?

दर मान्सून मध्ये विदर्भात सरासरी ९३७.३ मी पाऊस होत असतो. यंदा प्रत्यक्षात १०९८.५ स पाऊस झाला आहे. विदर्भात ११७म अधिक पावसाची नोंद झाली असून नागरिकांसह शेतकऱ्यांना दिलासा मिळालाय.

परतीच्या पावसाचा मुक्काम कधीपर्यंत?

हवामान खात्याने दिलेल्या अंदाजानुसार सध्या नैऋत्य मोसमी पावसाचा परतीचा प्रवास सुरू झाला आहे. राजस्थान, हरियाणा, पंजाब तसेच जम्मू कश्मीर, हिमाचल प्रदेश या भागातून सध्या मान्सून एक्झिट घेत आहे. पुढील दोन ते तीन दिवसात या भागातून मान्सून माघारी फिरेल. दरम्यान पाच ऑक्टोबरनंतर उत्तर महाराष्ट्रात पावसाचा जोर काहीसा वाढवून त्यानंतर मान्सून माघारी फिरेल असा अंदाज देण्यात आला आहे.

### राज्यातील होमगार्ड्सची दिवाळी गोड, मानधनात जवळपास दुप्पटीने वाढ; मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय!

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्य सरकारकडून अनेक मोठे निर्णय घेण्यात आले आहेत. सरकारन कापूस सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना अनुदान वितरण करण्यास सुरुवात केली आहे. राज्य मंत्रिमंडळात यासंदर्भात निर्णय घेण्यात आला आहे. त्यासाठी सरकारने पहिल्या टप्प्यात सुमारे २ हजार ३९९ कोटी रुपयांच्या वाटपाला मंजुरी दिली आहे. त्यानंतर आता राज्याची कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी प्रयत्नशील असणाऱ्या होमगार्ड्संदर्भातही सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. सरकारने होमगार्डच्या मानधानात जवळपास थेट दुप्पट वाढ केली आहे. म्हणजेच होमगार्ड्सना मिळणारा पगार आता थेट दुप्पट झाला आहे. त्यासाठी सरकारने ७९५ कोटी रुपयांच्या खर्चास मान्यता दिली आहे.

सरकारने नेमका काय निर्णय घेतला आहे?

मिळालेल्या ताज्या माहितीनुसार राज्यातील होम गार्ड्सच्या भत्त्यात भरीव वाढ करण्याचा निर्णय आज (१ ऑक्टोबर) झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला आहे. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. या निर्णयाचा लाभ जवळपास चाळीस हजार होम गार्ड्सना होणार आहे. सध्या या होमगार्ड्सना कर्तव्य भत्ता म्हणून दररोज ५७० रुपये मिळतात. सरकारच्या नव्या निर्णयानुसार आता हाच कर्तव्यभत्ता आता तेट १ हजार ८३ रुपये करण्यात येईल. याशिवाय उपहार भत्ता दोनशे रुपये, कवायत भत्ता १८० रुपये, खिसा भत्ता शंभर रुपये, भोजन भत्ता २५० रुपये अशी जवळपास दुपटीने वाढ करण्यात आली आहे. या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी सरकारने ७९५ कोटी रुपयांची मान्यता दिली आहे.

# सर्वसामान्य व महिलांचा विकास हेच शासनाचे ध्येय : आ. भावना गवळी

दैनिक आपला विदर्भ



**केनवड/प्रतिनिधी :** केनवड येथे जाहीर सभा विविध योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन केनवड सर्वसामान्यांचे हित डोळ्यासमोर ठेवून शिंदे सरकार विविध योजना राबवित आहेत गोरगरिबांचा विकास व महिलांचा सर्वांगीण विकास हेच शासनाचे ध्येय आहे.असे प्रतिपादन आमदार भावना गवळी यांनी केले १ ऑक्टोबर रोजी केनवड येथे आयोजित जाहीर सभेत बोलत होत्या.

या कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला पुष्पहार घालून करण्यात आली. तसेच यावेळी विठ्ठल रुक्मिणी मंदिर संस्थान व मारुती मंदिर संस्थान समिती व ग्रामपंचायत केनवड यांच्या वतीने आ. भावना गवळी पाटील यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी मार्गदर्शन करताना आ. भावना गवळी यांनी विठ्ठल मंदिर संस्थान येथील कार्यक्रमामध्ये जुन्या आठवणींना उजाळा दिला. आ भावना गवळी मार्गदर्शन करताना पुढे म्हणाल्या की, मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना,महिलांना बचत गट संदर्भात मार्गदर्शक व शासनाच्या विविध जनकल्याणकारी योजना आहेत. त्या सर्व सामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी जनजागृती करण्यात येत आहे.

या योजनांचा सर्वसामान्य नागरिकांनी व महिलांनी लाभ घेऊन आपली आर्थिक प्रगती करावी, प्रत्येक घटकापर्यंत जाऊन विकास कामासाठी प्रयत्नशील राहू,प्रत्येक घटकाला न्याय देण्याचा प्रयत्न करु,केनवड येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अशवृढ पुतळा उभारण्यासाठी प्रयत्न करु व गावातील प्रत्येक धार्मिक सामाजिक शैक्षणिक स्थळांना, मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देऊ, येत्या काळात शेतकऱ्यांच्या विकासासाठी प्रयत्न करु,रिसोड तालुक्यातील केनवड सारख्या मोठ्या बाजारपेठ आसलेल्या गावात मोठया प्रमाणात उद्योग धंदे उभारणीसाठी तसेच महिला सक्षमीकरणासाठी नवनवीन महिला उद्योग करण्यास प्राधान्य देत आहे. महिलांनी शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेऊन विकास साधवा असे आवाहन आ. भावना गवळी पाटील यांनी केले.

आमदार गवळी यांच्या नेतृत्वात युवकांचा शिवसेनेत प्रवेश सोनवड येथे आयोजित कार्यक्रमात आ. भावना गवळी पाटील यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून युवकांनी शिवसेनेत प्रवेश केला.सर्व गावातील महिला मंडळींनी भावना गवळी यांचा सत्कार करून आपल्या समस्या मांडल्या. त्यावेळीं सर्व गावातील जनता महिला, पुरुष मोठा युवा वर्ग, शिवसेना महायुतीतील पदाधिकारी गावातील प्रतिष्ठित नागरिक गावकरी मोठ्या प्रमाणात उपस्थीत होतें. येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये हा कार्यक्रम आयोजीत करण्यात आला होता.पण पावसामुळे एनवेळी कार्यक्रम विठ्ठल मंदिर संस्थान मध्ये घेण्यात आला.

## श्री बालाजी महाराज वार्षिक उत्सवास अटीशर्तीसह परवानगी; जिल्हाधिकारी यांचे आदेश

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** देऊळगांव राजा येथे श्री बालाजी महाराज वार्षिक उत्सव व यात्रा दरवर्षी घटस्थापनेपासून भरविण्यात येते. ही यात्रा दि. ३ ऑक्टोबर ते २५ नाव्हेंबर २०२४ पावेतो परंपरागत साजरी करण्यात येणारी बालजी महाराज वार्षिक यात्रा शासनाने ठरवून दिलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहुन परवानगी देण्याचे आदेश जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी निर्गमित केले.

गुरुवार दि. ३ ऑक्टोबर घटस्थापना, शुक्रवार दि. ११ ऑक्टोबर रोजी मंडपोत्सव, दसरा पालखी मिरवणुक दि. १२ ऑक्टोबर मध्यरात्री पासुन ते दि १३ ऑक्टोबर. सोमवार दि. २१ ऑक्टोबर रोजी लळीत उत्सव, दि. २ नोव्हेंबर ते २५ नोव्हेंबर २०२४ पर्यंत कार्तिक उत्सव या कालावधीत अटी व शर्तीच्या अधिन राहुन तसेच लोकनाट्य (तमाशा) यांना वगळून उत्सव साजरा करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

अटी व शर्ती याप्रमाणे : यात्रेमध्ये कोणताही व्यवसाय करावयाचा झाल्यास संबंधित विभागाची परवानगी घेणे आवश्यक राहील. यात्रेमध्ये कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने मध्यरात्री १२ वाजेनंतर कोणताही व्यवसाय चालू ठेवता येणार नाही. श्री बालाजी संस्थान व्यवस्थापन समिती देऊळगाव राजा यांनी चेंगराचेंगरी सारखा प्रकार होवू नये. जिवित, वित्तहानी होऊ नये या दृष्टीने संस्थानचे वतीने जास्तीत जास्त स्वयंसेवक नेमणे बंधनकारक राहील. लळिताचे दिवशी प्रसाद वाटपाचे वेळी सर्व भाविक हे रांगेत येतील व आवश्यक त्या ठिकाणी भाविकांच्या व्यवस्थेसाठी बॅरकगटींगची व्यवस्था करण्यात यावी. वाहन धारकांना वाहने लावण्याकरिता पार्किंगची व्यवस्था, शिवाजी हायस्कुलच्या प्रांगणात चारचाकी वाहनाची व्यवस्था व नगर परिषद शाळेच्या प्रांगणात करण्यात यावी. त्यासाठी योग्य तो पोलीस बंदोबस्त ठेवण्यात यावा. यात्रास्थळी रस्त्यावर अडथळा निर्माण होणार नाही याकरीता आवश्यक तो पालीस बंदोबस्त ठेवण्यात यावा. नगर पालिका प्रशासन, पोलीस विभाग, महसुल विभाग बांधकाम विभाग व संबंधित इतर विभाग यांनी दिलेल्या निर्देश पाळणे आयोजन संस्थानास बंधनकारक राहिल. यात्रेतील भाविकांची व्यवस्था व सुरक्षिततेबाबत केलेल्या नियोजनाची एक प्रत पोलीस विभागाकडून मंजूर करुन घेणे आयोजन संस्थानास बंधनकारक राहील. सर्व सोई सुविधा पुरविण्याची जबाबदारी आयोजन संस्थानाची राहिल. कायदा व सुव्यवस्था सांभाळण्यासाठी प्रशसनाच्या मागणीप्रमाणे सोयी सुविधा पुरविणे आयोजन संस्थानाला बंधनकारक राहिल. सदर मिरवणुकी दरम्यान भाविक दर्शनासाठी गर्दी करणार नाहीत तसेच मिरवणुकीमध्ये सामील होणार नाही, याबाबतची सर्वो तोपरी दक्षता घेण्याची जबाबदारी आयोजन संस्थानाची राहील.

## लोकसभा निवडणुकीत १४ मतदारसंघात व्होट जिहाद, फडणवीसांचा दावा, संजय राऊतांचा जोरदार पलटवार

**मुंबई/प्रतिनिधी :** लोकसभा निवडणुकीत ४८ मतदारसंघांपैकी १४ मतदारसंघात व्होट जिहाद झाल्याचा दावा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. फडणवीसांच्या दाव्यानंतर आता राजकीय वर्तुळातून विविध प्रतिक्रिया उमटत असून आता शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊतयांनी देवेंद्र फडणवीस यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे.


संजय राऊत म्हणाले की, व्होट जिहादकाय असतो ते त्यांना एकदा विचारा. त्यांच्या तोंडात सध्या जिहाद खूप येत आहे. ते दुसरीकडे कुठे तलाक देत आहेत का? की कोणाशी निकाह करत आहेत? मतांसाठी दुसऱ्या कुठल्या पक्षाशी ते निकाह करत आहेत का? हे काय सारखं जिहाद, जिहाद करत आहेत. आधी जिहादचा अर्थ समजून घ्या मग बोला, असा पलटवार संजय राऊत यांनी केलाय.

ते पुढे म्हणाले की, तुम्हाला भ्रष्ट लोकांची मत चालतात, तुम्ही भ्रष्ट्राचाऱ्यांशी निकाह लावला असं बोलू का? ७० हजार कोटींचे घोटाळे, एकनाथ शिंदे (एज्ञहरूए एप्म्हा) यांचे घोटाळे, चाळीस आम दारांचे घोटाळे या सगळ्या भ्रष्टाचारांना तुम्ही आपल्याबरोबर घेतलं. मग तुम्ही त्यांच्याशी निकाह लावला असं सांगू का? असा टोला देखील संजय राऊत यांनी देवेंद्र फडणवीस यांना लगावला आहे.

कोल्हापूर येथे एका कार्यक्रमात बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले होते की, लोकसभा निवडणुकीत व्होट जिहाद पाहण्यास मिळाले. धुळे लोकसभेला सहापैकी पाच मतदारसंघात आघाडीवर असलेला उम ेदवार केवळ मालेगाव मध्य मतदारसंघात १ लाख ९४ हजार मतांनी मागे जातो आणि त्याचा चार हजार मतांनी पराभव होतो. निवडणुकीत हार जीत महत्वाची नाही, कधी हा पक्ष जिंकेल, तर कधी तो पक्ष जिंकेल. मात्र, संघटित मतदान करून हिंदुत्ववाद्यांना पराभूत करू शकतो, असा काही लोकांचा आत्मविश्वास वाढला आहे. म्हातारी मेल्याचे दु:ख नाही, पण काळ सोकावतो आहे.

## परतीच्या पावसामुळे भाज्यांचे दर कडाडले

दैनिक आपला विदर्भ



**पुणे/प्रतिनिधी :** गेल्या एक महिन्यापासून सुरू असलेल्या संततधार पावसाने व गत आठ दिवसांपासून परतीच्या पावसाने शेतमालाची मोठी नुकसान केली आहे. याचबरोबर बागायती पिकांचे व भाजीपाल्यांचे सुद्धा प्रचंड नुकसान झाले असून आता मात्र सणासुदीच्या काळात भाज्यांचे दर भाजीमंडीत कडाडले आहेत. त्यामुळे आता भाजी खरेदी करणे हे सर्वसामान्याच्या आवाक्याबाहेर गेले असल्याचे चित्र बाजारात दिसून येत आहे. राज्यभर परतीच्या पावसाने शेतमालाची प्रचंड नुकसान केली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या हाती आलेल्या पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने शेतकरी वर्ग हवालदिल झाला आहे. सध्या शेतकऱ्यांच्या शेतामध्ये मका,कपाशी, टोमॅटो, मिरची आदी पिकांचे परतीच्या पावसामुळे नुकसान होत असल्याने बाजारात हा भाजीपाला चांगलाच भाव खात आहे. परिणामी शहरातील भाजी मंडईत येणाऱ्या भाज्या महागल्या आहेत आणि याचा फटका ग्राहकांना बसत आहे. ज्या भाज्यांचे दर ३० ते ४० रुपये प्रति किलो होते. आजरोजी तेच दर हे ८० ते १०० रुपये प्रति किलोवर पोहचले आहेत. पित्तृपक्ष सुरू असल्यामुळे नागरिकांना भाज्या चढ्या दराने खरेदी कराव्या लागत होत्या. पितृपक्ष संपल्यानंतर भाज्यांचे दर कमी होतील, मात्र लसूण व कांदा यांचे दर जोपर्यंत नवीन माल येत नाही तोपर्यंत स्थिर राहतील अशी माहिती भाजी विक्रेत्यांनी दिली आहे. आता पुढे हवाळ्याच्या काळात भाजीपाल्याची आवक काही प्रमाणात वाढण्याचा अंदाज असून त्यानंतर भाजीपाल्याचे दर कमी होतील, तर तुरीच्या शेंगा आल्यानंतर भाजीपाला अत्यंत स्वस्त होईल, असा अंदाज वर्तविला जात आहे. कांदा व लसून अवाक्याबाहेर सध्या बाजीमंडीत कांदा व लसूणाचे दर हे सर्वसामान्याच्या आवाक्याबाहेर आहेत. लसून हा सरासरी ६० ते ८० रुपये पाव प्रमाण विक्री होत आहे. तर कांद्याचे दर हे ६० रुपये प्रतिकिलोवर गेले आहेत. नवीन कांदा व लसूण येईपर्यंत कांदा व लसूणाचे दर मात्र कडाडलेलेच राहणार असल्याचा अंदाज आहे.

पान १ वरून...

### संभाजीराजे छत्रपतींच्या स्वराज संघटनेला

आपले कर्तव्य आहे. महाराष्ट्रातील जनतेचे आपल्यावर असलेले प्रेम, पक्ष संघटनेचे कार्यकर्ते व हितचिंतकांचे कष्ट, राज्याच्या राजकारणाला असलेली एका नवीन व सुसंस्कृत पर्यायाची आवश्यकता ही आगामी विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्र स्वराज्य पक्षाच्या उमेदवारांना भरघोस मतांनी विजयी करत, परिवर्तन महाशक्तीस सत्तास्थानी घेऊन जाईल'', असे ते म्हणाले.

२०२२ मध्ये केली होती स्वराज्य संघटनेची स्थापना

दरम्यान, संभाजराजे छत्रपती यांनी २०२२ मध्ये स्वराज्य संघटनेची स्थापना केली होती. स्वतंत्र पक्ष स्थापन करावा असं अनेकांनी सुचवलं त्यामुळे हा निर्णय घेतल्याचं त्यांनी म्हटलं होतं. ''तुम्ही वेगळा पक्ष स्थापन करायला हवा असं अनेकांनी सांगितलं. त्यांचे मी आभार व्यक्त करतो. सोशल मीडियाची, शिवभक्तांची काय ताकद आहे हे गेल्या काही दिवसांत समजलं. या ५-६ दिवसांत अनेकांनी मला शक्य त्या सर्व माध्यमातून सांगितलं की संभाजीराजे, तुम्ही स्वतंत्र पक्ष काढा. मी त्यांचा आदर आणि आभार व्यक्त करतो. हीच भावना आमच्याबद्दल राहू द्यावी'', असं ते म्हणाले होते.

## या चिमुकली ने बुद्धिमतने कमी वयात मिळवले अनेक मोठे पुरस्कार

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** समर्थाचा जन्म मुंबई, महाराष्ट्र येथे २६ ऑगस्ट २०२१ रोजी झाला. तिची आई महालक्ष्मी पिल्लई यांनी तिला प्रशिक्षण देण्यास सुरुवात केली जेव्हा ती फक्त पाच महिन्यांची होती. समर्था महालक्ष्मी यांना त्यांच्या असाधारण बुद्ध्यांक आणि संभाषण कौशल्यासाठी जागतिक मान्यता मिळाली. २ वर्षे आणि १० महिन्यांच्या वयात, तिने आधीच अनेक पुरस्कार मिळवले आहेत. १४ महिन्यांच्या वयात, तिला सर्व सामान्य ज्ञान (GK) चित्रे ओळखण्यासाठी आणि वाचण्यासाठी सर्वात तरुण प्रतिभावान बालक म्हणून भारताच्या जागतिक विक्रमात स्थान देण्यात आले. नंतर तिची आंतरराष्ट्रीय प्रतिभा आणि बुद्धिजीवींच्या PITI प्रोफाइलसाठी १७ व्यक्तिमत्त्वांमध्ये जागतिक स्तरावर सर्वात तरुण असाधारण मूल म्हणून निवड झाली. तिच्या आईने प्रश्न-उत्तर सत्रांसाठी तिची संवाद कौशल्ये वाढवण्यावर लक्ष केंद्रित केले. समर्थाने ५ मिनिटांत ५४ GK प्रश्नांची उत्तरे आणि नंतर ७० GK प्रश्नांची उत्तरे फार कमी वेळात दिल्याबद्दल Influencer Books of World Records (International) मध्ये हजेरी लावली. युनिव्हर्सल रेकॉर्ड फोरमने तिला कमाल संख्या GK उत्तरांचा प्रयत्न केल्याबद्दल एक विलक्षण प्रतिभावान मूल म्हणून प्रमाणित केले. तिने अल्पावधीतच १०० GK प्रश्नांची उत्तरे दिली, सर्वात तरुण GK prodigy ची पदवी मिळवली. समर्थांना GK prodigy म्हणून दादासाहेब फाळके पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे आणि सर्वात तरुण GK मास्टर म्हणून सोशलली पॉईंट फाउंडेशनकडून राष्ट्रीय पुरस्कार मिळाला आहे. तिला ग्लोबल किड्स अचिव्हर्स



अवॉर्ड द्वारे शिक्षणातील सर्वात लहान हुशार मुलाची पदवी देण्यात आली आणि भारत न्यूज कडून प्राइड डॉटर ऑफ इंडिया आणि आयक्यू मास्टर म्हणून नॅशनल आयकॉन अवॉर्डने सन्मानित करण्यात आले. अलीकडेच, तिला इंफ्लुएंसर बुक्स ऑफ रेकॉर्ड्समध्ये वैशिष्ट्यीकृत करण्यात आले. २ वर्षे आणि ३ महिने वयाच्या सर्व कॅबिनेट मंत्र्यांची नावे देण्याचा जागतिक विक्रम धारक म्हणून. अल्पावधीत जास्तीत जास्त GK प्रश्नांची उत्तरे दिल्याबद्दल तिने युनिव्हर्सल बुक ऑफ रेकॉर्डमध्ये देखील हजेरी लावली. समर्थांना फिल्मोरा मीडियाच्या आंतरराष्ट्रीय कंटेंट क्रिएटर अवॉर्डमध्ये प्राइड डॉटर ऑफ महाराष्ट्र ही पदवी प्रदान करण्यात आली आणि भरर न्यूजने भारतातील सर्वात तरुण प्रभावशाली म्हणून नॅशनल आयकॉन अवॉर्डनेही सन्मानित केले. ती एका पॉडकास्टवरही दिसली आहे. नुकताच प्रतिष्ठित महाराष्ट्र रत्न पुरस्कार २०२४ हा सर्वात तरुण असाधारण-प्रतिभावान आणि प्रभावशाली (महाराष्ट्र कन्या) म्हणून दुपारच्या दैनिकातून मिळाला.

## विविध वृत्त...

### चंद्रपूर जिल्हा महिला काँग्रेस अध्यक्षा नम्रता ठेम्सकर यांचा राजीनामा



दैनिक आपला विदर्भ

**चंद्रपूर/प्रतिनिधी :** चंद्रपूर जिल्हा महिला काँग्रेस अध्यक्ष नम्रता ठेम्सकर यांनी आज आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. चंद्रपूर जिल्ह्यात काँग्रेसच्या नियुक्त्या या एखाद्या समाजासाठी राखीव असल्यासारख्या होत आहेत त्यामुळे काँग्रेसमध्ये जातीयवाद निर्माण झाला आहे. या जातीयवादाचा निषेध करण्यासाठी तसेच जेव्हा वरोरा मतदारसंघातून अर्ज भरला तेव्हा तो मागे घेण्यासाठी माझ्यावर दबाव टाकण्यात आल्याने राजीनामा दिला आहे, ज्यांनी माझ्यावर दबाव टाकला त्यांची नावे मी वेळ आल्यावर पुराव्यानिशी जाहीर करेल अशी प्रतिक्रिया नम्रता ठेम्सकर यांनी दिली आहे. तसेच कार्यकर्त्यांनी फक्त खुर्चा,सतरंज्याच उचलायच्या का ?असा सवाल त्यांनी यावेळी उपस्थित केला आहे.

निवृत्तीवेतन धारकांचा ८ ऑक्टोंबर रोजी संवाद मेळावा

**बुलडाणा/प्रतिनिधी :** शासन सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या निवृत्तीवेतन धारक, कुटुंब निवृत्तीवेतन धारकांचा संवाद मेळावा दि. ८ ऑक्टोबर रोजी दुपारी १ वाजता जिल्हा कोषागार कार्यालय बुलडाणा येथील प्रशिक्षण सभागृहामध्ये आयोजित करण्यात आला आहे. या संवाद मेळावास सर्व सेवानिवृत्त धारकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा कोषागार अधिकारी श्री. ऋषीकेश वाघमारे यांनी केले आहे.

### पंतप्रधान आणि गृहमंत्री राज्यात आले की उद्योग बाहेर जातात; संजय राऊतांचा हल्लाबोल

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांचे महाराष्ट्रात दौरे वाढले आहेत. आगामी विधानसभा निवडणूक २०२४ चा आढावा घेण्यासाठी गृहमंत्री अमित शाह हे नवी मुंबईत येणार आहेत. त्यावरुन उबाठा गटाचे खासदार संजय राऊत यांनी मोठा हल्लाबोल केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह हे राज्यात आले की राज्यातील उद्योग बाहेर जातात, असा जोरदार हल्लाबोल संजय राऊत यांनी केला.

अमित शाहांनी मणिपूर, काश्मीरला जावं : सध्या काश्मीरमध्ये निवडणुका सुरू आहेत. जम्मू काश्मीरमध्ये नेहमीच दहशतवादी हल्ले होतात. त्यामुळे गृहमंत्री अमित शाह यांनी जम्मू काश्मीरला जाऊन सुरक्षेचा आढावा घ्याव्या, असं संजय राऊत यांनी यावेळी स्पष्ट केलं. तर मणिपूर गेल्या अनेक दिवसांपासून जळत आहे. तिकडंही जाऊन अमित शाह यांनी आढावा घ्या. मात्र ते सोडून गृहमंत्री अमित शाह हे निवडणुकीसाठी महाराष्ट्रात येतात. गृहमंत्री अमित शाह आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी हे महाराष्ट्रात आले की, महाराष्ट्रातील उद्योग बाहेर जातात, असंही संजय राऊत यांनी यावेळी बोलताना सांगितलं.

### गोविंदावर एकदा झाला होता मुंबई पोलिसांना धमकावल्याचा आरोप, तो म्हणाला होता – मी तुमच्या प्रमुखाला फोन करतो!

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** गोविंदाच्या पायाला चुकून गोळी लागली असून ही घटना घडली, तेव्हा तो परवाना असलेले रिव्हॉल्व्हर साफ करत असल्याचे बोलले जात आहे. त्याला क्रिटिकेअर रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्याच्यावर येथे उपचार सुरू आहेत. मुंबई पोलीसही घटनास्थळी दाखल झाले आहेत. पण एकेकाळी गोविंदावर मुंबई पोलिसांना धमकावल्याचा आरोपही करण्यात आला होता. हे प्रकरण काय होते ते आम्ही तुम्हाला सांगतो.

खरंतर गोविंदा एकदा त्याच्या चित्रपटाचे शूटिंग करत होता. त्याच्या चित्रपटात गणेश विसर्जनाचे दृश्य होते. त्याचे चित्रीकरण होते. पण त्याला तेथे शूट करण्याची परवानगी नव्हती. त्याने परवानगी न घेता गोळी झाडली. यानंतर मुंबई पोलिसांनी त्याला रोखले. त्यावर गोविंदाने त्यांना धमकी दिली. असा आरोप त्याच्यावर करण्यात आला.

२०१३ ची ही घटना आहे. मिड डेच्या वृत्तानुसार, मुंबईतील मार्वे बीचवर गणपती विसर्जन होत होते. गोविंदाही तिथे उपस्थित होता. तिथे तो बहुधा त्याच्या 'किल दिल' या चित्रपटाचे शूटिंग करत होता. पोलिस अधिकारी आले आणि त्यांनी त्याला जाण्यास सांगितले, तेव्हा गोविंदाचा संयम सुटला. तो पोलिसांवर संतापला. तसेच त्यांना धमकावले. तो म्हणाला की मी खासदार आहे, आत्ताच पोलीस बॉसला फोन करतो.

पण इथे लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे गोविंदा २००९ पर्यंतच खासदार राहिले आणि हे प्रकरण यानंतर अनेक वर्षांनी घडले. मात्र, पोलीस प्रमुखांना फोन करून धमकी दिल्यानंतरही गोविंदाला तेथून जाण्यास सांगण्यात आले. मात्र तो तेथून निघून गेला की नाही याबाबत कोणतीही माहिती मिळालेली नाही. गोविंदाही यावर अधिक बोलला नाही. पोलिसांचे आरोप खरे की खोटे, याची पुष्टी करता येत नाही.

एक काळ असा होता की गोविंदा बॉलिवूडमध्ये प्रसिद्ध होता. पण यावेळी त्याच्याकडे काम नाही. त्याची कारकीर्द चांगली जात नाही. अनेक वर्षांपासून त्याने कोणताही चित्रपट केलेला नाही. त्याच्या करिअरमध्ये कोणते वळण येते ते पाहूया. त्याला चित्रपट मिळतात की नाही?

# गावाच्या विकासासाठी सरपंचांना पाठबळ देणार आ. भावनाताई गवळी

दैनिक आपला विदर्भ




**रिसोड/प्रतिनिधी :** तालुक्यातील येवता येथे रिसोड मालेगांव तालुक्यातील सरपंचांचा मेळावा व सिद्धेश्वर संस्थानवर डोमशेड लोकार्पण सोहळा नुकताच पार पडला कार्यक्रमाच्या उदघाटक म्हणून आ. भावनाताई गवळी उपस्थित होत्या यावेळी आमदार भावनाताई गवळी यांनी सरपंचांना मार्गदर्शन करतांना सांगीतले की, गावाच्या विविध अडीअडचणी शासनस्तरावर सोडविण्यासाठी व गावाच्या विकासासाठी सरपंचांच्या पाठीशी मी खंबीरपणे उभी असल्याचे प्रतीपादन आमदार भावनाताई यांनी सरपंच मेळाव्यात केले यावेळी विविध विषयावर त्यांनी उपस्थीतांना संबोधीत केले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी जि.प. माजी अध्यक्ष दिलीपराव जाधव हे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणुन बाळासाहेब खरात माजी सभापती रिसोड, शामराव उगले, माजी सभापती रिसोड मारोतराव लादे, माजी जि.प. सदस्य, विष्णुपंत भुतेकर सभापती कृ.उ.बा.स. रिसोड, गजाननराव पाचरणे माजी सभापती रिसोड, शंकरराव बोरकर भाजपा प्रदेश कार्यकारणी सदस्य, गणेश उंडाळ सभापती कृ.उ.बा.स.मालेगांव, वैशालीताई येळणे, महिला आघाडी जिल्हा संघटीका वाशीम, नारायणराव सानप भाजपा नेते, बबनराव गवळी जेष्ठ मार्गदर्शक, परसरामजी दहात्रे जेष्ठ मार्गदर्शक, मंगेश महाराज घुगे शिवसेना उपजिल्हाप्रमुख, सुनिल कायंदे, शिवसेना उपजिल्हाप्रमुख, प्रदिप पाटील कुटे शिवसेना स.प्र. रिसोड, गजाननराव नवघरे, भाजपा तालुका अध्यक्ष मालेगांव, शंकरराव मुंढे, जेष्ठ मार्गदर्शक, शिवाजीराव खानझोडे, शिवसेना तालुका प्रमुख रिसोड, विलास जाधव शिवसेना तालुका प्रमुख मालेगांव, प्रदिप पाटील मोरे युवासेना उपजिल्हाप्रमुख, बळीराम बोडखे सरपंच संघटना रिसोड, बबनराव मिटकरी सरपंच संघटना मालेगांव, ॲड गजानन आवताडे युवासेना ता.प्रमुख रिसोड, संध्याताई सरनाईक महिला आघाडी तालुका संघटीका, सुवर्णाताई नरवाडे उपसभापती पं. स. रिसोड, गजानन सारसकर रा. का. शहर अध्यक्ष मालेगांव, यांच्यासह रिसोड मालेगांव तालुक्यातील सरपचं व उपसरपंच यावेळी उपस्थित होते. उपस्थित सर्व सरपंचांचे सत्कार आ. भावनाताई गवळी, माजी जि.प. अध्यक्ष दिलीपराव जाधव व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. सरपंच मेळाव्यात उपस्थीत सरपंचांना ग्रामपंचायत विषयी यशदा पुणे प्रशिक्षक शालीकराम पडघान यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. महंत शांतीपुरी महाराज यांचा सत्कार आ. भावनाताई गवळी यांनी शाल श्रीफळ देउन केला, तर आ. भावनाताई यांचा सत्कार महंत शांतीपुरी महाराज यांनी केला. यावेळी आ. भावनाताई गवळी, दिलीपराव जाधव, विष्णुपंत भुतेकर यांचेही यावेळी भाषणे झाली. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आभार प्रदर्शन शिवसेना जिल्हाप्रमुख महादेवराव ठाकरे यांनी केले. कामा धंद्याचे दिवस असतांनी सुद्धा रिसोड मालेगांव तालुक्यातील बहुसंख्य सरपंच यावेळी उपस्थीत होते. उपस्थीत सर्व सरपंच उपसरपंच यांनी सरपंच व उपसरपंच यांचे मानधन दुप्पट केल्याबद्दल मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे व महायुती सरकारचे आभार व्यक्त केले. सिद्धेश्र्वर संस्थानवर आ. भावनाताई गवळी यांनी ४० लक्ष रूपये निधी देउन काम पुर्ण करून दिल्याबद्दल ग्रामस्थांनी व संस्थांनने आनंद व्यक्त केला.

## ज्युनियर एनटीआरच्या चित्रपटाचा चौथ्या दिवशी खेळ खल्लास

**मुंबई/प्रतिनिधी :** ज्युनियर एनटीआरच्या देवरा या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर दमदार ओपनिंग केली. त्यामुळे भविष्यात अधिक पैसे कमावेल, असा विश्वास होता. मात्र हा चित्रपट अपेक्षेप्रमाणे व्यवसाय करू शकला नाही. या चित्रपटाने भारतात पहिल्या दिवशी सुमारे ८२ कोटी रुपयांची कमाई केली आणि दुसऱ्या दिवशी पहिल्या दिवसाच्या कलेक्शनच्या निम्मीही कमाई करू शकला नाही. या ट्रेंडनंतर सोमवारीही चित्रपटाने फारसा व्यवसाय केला नाही. त्याचे कलेक्शन १२ कोटींपेक्षा थोडे जास्त होते. सोप्या भाषेत सांगायचे तर 'देवरा' सोमवारच्या परीक्षेत नापास झाला आहे.

'देवरा' रिलीज होऊन ४ दिवस झाले आहेत. या चित्रपटाने जवळपास १७३ कोटींचा व्यवसाय केला आहे. या चित्रपटाने पहिल्याच दिवशी एकूण कमाईच्या निम्मी कमाई केली होती. त्यानंतर बॉक्स ऑफिसवर चित्रपटाचा वेग मंदावला. ८२.५ कोटी रुपयांच्या बंपर ओपनिंगनंतर, चित्रपट बॉक्स ऑफिसवर अपयशी ठरला, तर इतर मोठ्या चित्रपटांच्या बाबतीत उलट घडले.

शुक्रवारी चित्रपटाची कमाई कमी झाली होती. शनिवार आणि रविवार हे सुट्टीचे दिवस असल्याने या दोन दिवसांत चित्रपटाचे कलेक्शन वाढते. मात्र ॲडव्हान्स बुकिंगच्या आधारे ज्युनियर एनटीआरच्या चित्रपटाने पहिल्या दिवशी बाजी मारली. मात्र दुसऱ्या दिवशी तो केवळ ३८.२ कोटींची कमाई करू शकला. तिसऱ्या दिवशीही हीच स्थिती कमी-अधिक होती. चित्रपटाने ३९.९ कोटींची कमाई केली. चौथ्या दिवशी चित्रपट आकाशातून थेट पृथ्वीवर आला. सोमवारी 'देवरा'ने केवळ १२.५ कोटींची कमाई केली. अंतिम आकडेवारी आल्यावर प्रकरण एक कोटीच्या वर किंवा खाली जाऊ शकते.

ज्युनियर एनटीआरचा चित्रपट फक्त तेलुगुमध्ये चांगला चालतो. तेलगू व्हर्जनचे कलेक्शन रिलीज झाल्यास परिस्थिती आणखी बिकट होईल. तेलगू व्हर्जनने पहिल्या दिवशी ७३.२५ कोटी रुपये, दुसऱ्या दिवशी २७.५५ कोटी रुपये आणि तिसऱ्या दिवशी २७.७ कोटी रुपयांची कमाई केली. चौथ्या दिवशी या चित्रपटाने केवळ तेलुगूमधून १२.५ रुपयांपैकी ८ कोटी रुपयांची कमाई केली.

ठ्ठ नंतर गी छ्ढ ची संपूर्ण भारतातील प्रतिमा आहे. या चित्रपटात हिंदी इंडस्ट्रीतील दोन मोठी नावे आहेत, सैफ अली खान आणि जान्हवी कपूर. अशा स्थितीत हिंदीत चांगली कमाई होईल, अशी अपेक्षा होती.

# सर्व यंत्रणांनी समन्वय ठेऊन उपाययोजना राबविण्याचे जिल्हाधिकारी यांचे निर्देश

## नागरिकांनी कायदा आणि सुव्यवस्था राखत सण-उत्सव साजरे करा- डॉ. किरण पाटील

दैनिक आपला विदर्भ



**बुलडाणा/प्रतिनिधी :** येणाऱ्या कालावधीत जिल्ह्यात विविध सण आणि उत्सव साजरे होणार असून नागरिकांनी कायदा आणि सुव्यवस्था राखत सर्व सण व उत्सव साजरे करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी किरण पाटील यांनी केले. तसेच सर्व शासकीय यंत्रणांनी समन्वय ठेऊन उपाययोजना राबविण्याचे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

येथील जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आयोजित समन्वय समितीच्या बैठकीत श्री. पाटील बोलत होते. यावेळी पोलिस मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात, पोलीस अधीक्षक विश्र्व पानसरे, अप्पर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, अप्पर पोलीस अधीक्षक भगवान महामुने तसेच सर्व उपविभागीय अधिकारी, पोलीस निरिक्षक, तहसिलदार, अधिकारी व कर्मचारी आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. पाटील म्हणाले की, आपल्या जिल्ह्याला सण, उत्सव शांततेत व उत्साहात साजरे करण्याची परंपरा आहे. हा नावलौकीक कायम राखण्यासाठी आपण सर्व प्रयत्न करुया. नवरात्र उत्सव दरम्यान नागरिकांना कुठलीही अडचण येवू नये तसेच त्यांच्या अडचणीचे तातडीने निवारण होण्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे. दुर्गादेवी विसर्जन नदी किंवा तलावात न करता कृत्रिम हौदातच करावे. विसर्जनाच्या ठिकाणी फिरते स्वच्छ्ता गृह आणि अग्निशामक यंत्रणा ठेवावी. ग्राम पंचायत आणि नगर पालिकेने आपल्या हद्दीतील अवैध अतिक्रमणे तात्काळ काढून टाकावीत. तसेच सण कालावधीत मास विक्री व मद्य विक्री करू नये असे आदेश काढावेत. ग्राम पंचायत आणि नगरपालिका यांनी रस्त्यावरील खड्डे बुजविण्याची कार्यवाही तातडीने हाती घ्यावी, संबधित विभागाने आपले अखत्यारीतील रस्त्यांची डागडुजी पूर्ण करावित. कुठेही वाहतुक कोंडी होणार नाही याची दक्षता घ्यावी, आरोग्य यंत्रणा सज्ज ठेवावी. सदैव विद्युत वितरण विभाग कार्यान्वीत राहील यादृष्टीने पूर्व नियोजन करावे, दुरध्वनी व्यवस्था सुस्थितीत राहील याची दक्षता घ्यावी, आदी सूचना जिल्हाधिकारी श्री. पाटील यांनी यावेळी दिल्या.

पोलीस अधीक्षक विश्व पानसरे म्हणाले की, सर्व शासकीय अशासकीय यंत्रणांनी समन्वय ठेवावा. तसेच नागरिकांनी सर्व धर्माचा आदर राखत सर्व सन व उत्सव शांततेत साजरे करावेत. कोणत्याही प्रकारचे समाज विघातक कृत्य होणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच कोणत्याही अफवांवर विश्र्वास ठेवू नये. कुठेही अनुचित घटना घडत असल्याचे निदर्शनास येताच तात्काळ पोलिसांना कळवावे.

## मराठा सेवा संघाच्यावतीने गुणवंताचा सत्कार व संवाद बैठक

दैनिक आपला विदर्भ

**रिसोड/प्रतिनिधी :** येथील मराठा महासंघाच्या वतीने गुणवंतांचा सत्कार व संवाद बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

बैठकीच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ मार्गदर्शक प्रा.जानराव देशमुख तर प्रमूख उपस्थितांमध्ये जिल्हाउपाध्यक्ष विजय बोरकर ,तालुकाध्यक्ष शिवाजी कवर , बाजार समिती संचालक रविभाऊ चोपडे, सामाजिक कार्यकर्ते संजय सदार हे होते.

या वेळी विविध सामाजिक ,शैक्षणिक ,शेतकरी चळवळ व शेतकऱ्यांच्या समस्या या विषयांवर चर्चा झाली आणि मराठा सेवा संघाचे कार्य खेड्यापाड्यात पोचावे यासाठी गावपातळीवर संवाद बैठकीचे आयोजन करण्याचे ठरले.

या बैठकीच्या निमित्ताने विविध सत्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये येथील कृषी उत्पन्न बाजार समिती सभापतीपदी निवड झाल्याबद्दल भूमिपुत्र संघटनेचे विष्णुपंत भूतेकर यांचा सत्कार करण्यात आला.

सवड येथे मुख्याध्यापक पदावर कार्यरत असलेले संतोष सपकाळ यांना महाराष्ट्र राज्य शिक्षक पॅनल तर्फे दिला जाणारा राज्यस्तरीय शिक्षक पुरस्कार मिळाल्याबददल व मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा मध्ये जि.प.शाळा सवड तालुक्यातून प्रथम आल्याबद्दल त्यांचेही अभिनंदन करून सत्कार करण्यात आला तसेच चइइड साठी शासकीय महाविद्यालयात निवडीबाबत कु. आदिती तोडकर, हर्षल साबळे, आदित्य बेंडवाले या गुणवंत विद्यार्थ्यांचा या वेळी मराठा सेवा संघाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

बाजार समिती सभापतीपदी निवडीबाबत सत्कार करत असताना शेतकऱ्यांचे बाजार समितीतील समस्याबाबत चर्चा झाली. यानिमित्ताने आपण शेतकरी हिताचे निर्णय घेण्यासाठी प्राधान्य देणार असल्याचे विष्णुपंत भुतेकर यांनी यावेळी बोलतांना सांगितले.

यावेळी या संवाद बैठकीसाठी दिनकर बोडखे, सचिन देशमुख, सुभाष खानझोडे, भिंगे सर, संतोष बिल्लारी, साबळे सर, तोडकर सर, बेंडवाले सर, साईनाथ शिंदे, सतिश नरवाडे, विजय साखरे, रंगनाथ गव्हाणे, अमोल मोरे, पंजाब नरवाडे, सुजित राठोड, संदीप कोकाटे, उमाकांत कष्टे, राजेश काळबांडे, होडगर सर, रुद्रप्पा चवरे, गजानन देशमुख, सतिश मोरे, हिम्मत गवळी, आनंद गालटे, मोहन घोटे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक दिलिप भिसडे सर यांनी तर आभार अमोल बोडखे सर यांनी मानले.

## जिल्ह्यातील खरीप हंगामाची नजर अंदाज पैसेवारी जाहीर

**बुलडाणा/प्रतिनिधी :** सन २०२४-२५ या खरीप हंगामातील जिल्ह्यातील एकूण १४२० गावांची अंतिम पीक पैसेवारी जाहीर झाली आहे. जाहिर झालेल्या पिक पैसेवारीनुसार जिल्ह्यातील १४२० गावापैकी १३४७ गावांची नजर अंदाज पिक पैसेवारी ५० पैसेचेवर तर ७३ गावांची नजर अंदाज पिक पैसेवारी ५० पैशांच्या आत जाहीर करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाने याबाबत तालुकानिहाय गावे व नजर अंदाज पीक पैसेवारी जाहीर केली आहे.

तालुकानिहाय अंतिम पीक पैसेवारी ५० पैसेपेक्षा जास्त पैसेवारी याप्रमाणे : बुलडाणातील ९८ गावांची अंतिम पीक पैसेवारी ७२, चिखली तालुकात १४४ गावांची पैसेवारी ७०, देऊळगाव राजा ६४ गावांची पैसेवारी ७२, मेहकर १६१ गावांची पैसेवारी ७२, लोणार ९१ गावांची पैसेवारी ६२, सिं. राजा ११४ गावांची पैसेवारी ६८, मलकापूर ७३ गावांची पैसेवारी ६७, मोताळा १२० गावांची पैसेवारी ६१, नांदुरा ११२ गावांची पैसेवारी ६५, खामगांव १४६ गावांची पैसेवारी ५३, जळगांव जामोद ११९ गावांची पैसेवारी ५५ पैसे आणि संग्रामपूर १०५ गावांची अंतिम पीक पैसेवारी ७३ आहे. तर ५० पैसेपेक्षा कमी शेगांवमधील ७३ गावांची ४७ पैसेवारी जाहिर झाली आहे. असे जिल्ह्याची एकूण १४२० गावांची अंतिम पीक पैसेवारी ६५ पैसे जाहिर झाली आहे, असे जिल्हाधिकारी कार्यालयाने प्रसिद्धी पत्रकान्वये कळविले आहे.

# रिसोड मेहकर मार्गावर वाटमारी; ३६ हजार रुपये किमतीचे सोन्याचे मंगळसूत्र लुटले

दैनिक आपला विदर्भ




**रिसोड/प्रतिनिधी :** रिसोड मेहकर मार्गावर एकलासपूर ते सोनाटी या दरम्यान देवदर्शनाला जात असलेल्या एका परिवारास गाडी अडवून वाटमारी करत ३६ हजार रुपये किमतीचे सोन्याचे मंगळसूत्र लुटल्याची घटना दिनांक २९ सप्टेंबर रोजी रात्री दहा वाजताच्या दरम्यान घडली. याप्रकरणी फिर्यादी नामे बाबासाहेब दत्तराव जाधव, वय ३१ वर्षे रा पिंपरी बु., ता. कळमनूरी, जि. हिंगोली यांनी सदर घटनेची तक्रार मेहकर पोलीस स्टेशनला दिल्या असता मेहकर पोलीस स्टेशनमध्ये विविध कलमानुसार गुन्हा दाखल करून सदर घटना ही रिसोड तालुक्यात येत असल्याने हे प्रकरण रिसोड पोलीस स्टेशनलादि.३० सप्टेंबर रोजी वर्ग करण्यात आले आहे. याबाबत माहिती अशी की बाबासाहेब जाधव हे दिनांक २९ सप्टेंबर रोजी रात्री ८ :४५ ते ९:१५ वा दरम्यान त्यांची पत्नी व दोन मुलांसह मारूती सुझुकी कंपनीनी स्विफ्ट डिझायर कार क्रमांक एमएच-१८-डब्ल्यू-०९६९ ने जाळीचा देव दर्शनाकरीता जात असतांना ४ अनोळखी इसमांनी हात दाखवून त्यांची गाडी थांबवण्याचा प्रयत्न केला. तेव्हा जाधव यांनी गाडी थांबवली असता त्यातील एका व्यक्तीने जवळ येवून गची पकडली. त्यामुळे जाधव घाबरून गाडीचे एक टायर रोडचे खाली उतरून तेथून गाडी जोराने पुढे काढली. तेव्हा समोर रोडवर उभे असलेले त्यातील एका इसमाने गाडीचे समोरील काचावर दगड मारला, त्यामूळे जाधव यांनी आणखी जोरात गाडी पळवली. तेव्हा ते लोक त्यांचे मोटार सायकलने मागे आले. त्यांचे भितीने जाधव यांनी त्यांची गाडी रोडने १०-१५ किलोमीटर घेवून आले. तेव्हा रोडवर आणखी ०८-१० लोक उभे होते. त्यापैकी दोघांनी गाडीचे समोरील काचावर दगड मारून काच फोडला तर त्यातील एक दगड जाधव यांचे डोक्यावर समोरील बाजूला लागल्याने जाधव यांना चक्कर आली. म्हणून त्यांनी गाडी थांबवली असता त्यांचे पाठीमागून पाठलाग करत आलेले तसेच तेथे रोडवर उभे असलेले अनोळखी व्यक्तीपैकी एका व्यक्तीने गाडीच्या डावे बाजूचे टायरची हवा सोडली. तर एकाने गाडीचे बंपर व हेडलाईट फोडला. तसेच एकाने जाधव यांच्या पत्नीचे गळयातील मनी मंगळसूत्र वजन अंदाजे ९ ग्रॅम किंमत अंदाजे ३६,०००/- रूपयांचे बळजबरीने हिसकावून घेवून गेले. याप्रकरणी मेहकर पोलीस स्टेशनमध्ये विविध कलमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर प्रकरण हे रिसोड पोलीस ला वर्ग करण्यात आले आहे याबाबत रिसोड पुढील तपास करत आहे.